# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address rdc_akola@rediffmail.com web address :www.akola.nic.in

**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 486 /2020** **दिनांक: 08 /06/2020**

वाचा – 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020 No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 31 मे 2020
5. सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्र. कोरोना-२०२०/सीआर९७/एआरओ-०५ दिनांक २१.५.२०२०
५. जिल्हा शल्य चिकित्सक अकोला यांचे कार्यालयाचे पत्र क्र. जिशचि/८८०२/२०२० दिनांक ०८.०६.२०२०

**कोव्हीड-19 Icon व Ozone खाजगी रुग्णालये आरक्षित करणे बाबत.**

## आदेश

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2, 3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे, **आणि**

**ज्याअर्थी,** जिल्हा शल्य चिकित्सक अकोला यांनी सद्यस्थितीत कोव्हीड-19 आजाराचा प्रादुर्भाव जाणवत असल्याने शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय अकोला येथील वार्डामध्ये जागा अपुरी पडत असुन शहरातील खाजगी रुग्णालये व त्यांच्याशी संलग्नीत सर्व कर्मचारी व अधिकारी चमुसह सेवा उपलब्ध करुन घेणे आवश्यक असल्याचे सदर रुग्णालयाची सेवा उपलब्ध करणेआवश्यक असल्याचे कळविले आहे.

**त्याअर्थी** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 व सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्र. कोरोना-2020/सीआर97/एआरओ-05 दिनांक 21.5.2020 अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार, कोव्हीड रुग्णांना भरती करुन त्यांचेवर योग्य ते उपचार करण्याकरिता भारत सरकार यांचे पोर्टलवर नोंदणीकृत असलेले ICON HOSITAL Akola व OZONE HOSPITAL Akola ही दोन्ही खाजगी रुग्णालये नियमानुसार शुल्क आकारुन त्यांचे आस्थापनेवरील कार्यरत आवश्यक वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांचेसह **Dedicated Covid Hospital** म्हणून याद्वारे खालील अटी व शर्तीनुसार अधिग्रहीत करण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित करित आहे.

1. अधिग्रहीत करण्यात आलेल्या Icon Hospital चे संचालक यांनी कोव्हीड-19 च्या रुग्णांकरिता स्वतंत्र प्रवेशाची व्यवस्था करावी तसेच **4 ICU Bed व 6 Bed Isolation Unit** उपलब्ध करुन देण्यात यावे.
2. अधिग्रहीत करण्यात आलेल्या Ozone Hospital चे संचालक यांनी कोव्हीड-19 च्या रुग्णांकरिता स्वतंत्र प्रवेशाची व्यवस्था करावी तसेच **3 ICU Bed व 8 Bed Isolation Unit** उपलब्ध करुन देण्यात यावे.

..2..

3. ICMR यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश तसेच मार्गदर्शक सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
4. उपचारार्थ लागणारा पुरेशा प्रमाणातील तज्ञ डॉक्टर व कर्मचारी / अधिकारी वर्ग 24 X 7 नियमीतपणे उपस्थित ठेवावा लागेल.
5. उपरोक्त प्रमाणे अधिग्रहीत करण्यात आलेल्या दोन्ही रुग्णालयाने आदेशात नमूद केल्याप्रमाणे जिल्हा शल्यचिकित्सक अकोला यांचेकडे सूपूर्द करण्याची कार्यवाही करावी.
6. सदर रुग्णालयांमध्ये अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आवश्यकतेप्रमाणे रुग्ण पाठविण्याची व्यवस्था करावी.
7. जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांनी उपरोक्त दोन्ही रुग्णालयामध्ये ज्या व्यक्ती निरिक्षणाखली ठेवण्यात येतील त्या वैद्यकिय कक्षात तसेच या संदर्भात काम करणारे शासकीय अधिकारी / कर्मचारी याव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश राहणार नाही. या ठिकाणी आलेल्या व गेलेल्या व्यक्तींच्या आवश्यक नोंदी ठेवण्यात याव्या. तसेच सदर क्षेत्र हे फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 नुसार प्रतिबंधात्मक क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात येत आहे.
8. रुग्णालयाचे व्यवस्थापक यांनी अधिग्रहीत करण्यातआलेल्या रुगालयामध्ये विद्युत, पाणी व इतर आवश्यक सुविधा अखंडीत उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच रुग्णालयामध्ये एक नोडल अधिकारी यांनी नेमणूक करण्यात यावी.
9. या रुग्णालयामध्ये ज्या व्यक्ती निरिक्षणाखाली ठेवण्यात येतील त्यांची माहिती गोपनीय राहील या बाबत संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, भारतीय दंड संहिता, (1860 चा 45 ) याच्या कलम 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश **आज दिनांक 08 जून 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

जिल्हादंडाधिकारी कार्यालय अकोला
सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी —**

1. मा. आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
3. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
4. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
5. आयुक्त, महानगरपालिका अकोला
6. उपविभागीय अधिकारी अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. तहसिलदार अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. व्यवस्थापक, आयकॉन हॉस्पीटल अकोला यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
10. व्यवस्थापक, ओझोन हॉस्पीटल अकोला यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला